# हिवाळी विशेष शिबिर विवेचन अहवाल

## शैक्षणिक वर्ष : २०२५-२०२६

मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर २०२५ मंगळवार रोजी सकाळी ८.०० वाजता हिवरकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सर्व शिबिरार्थी विद्यार्थी महाविद्यालय परिसरात एकत्र जमले. त्यानंतर सकाळी ९.०० वाजता शिबिरस्थळी जाण्यासाठी प्रस्थान करण्यात आले. दृगधामणा येथील बोद्धविहार पोहोचल्यानंतर विद्यार्थ्यांनी पाण्याची सोय, सभोवतालच्या परिसराची स्वच्छता, राहण्याची व्यवस्था इत्यादी बाबींचे नियोजन कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली केले. त्यानुसार विद्यार्थ्यांमध्ये कामांचे वाटप करून गटविभागणी करण्यात आली.

## उद्‌घाटन सोहळा:-

मंगळवार  दिनांक १६ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता हिवाळी विशेष शिबिराचा उद्‌घाटन समारंभ आयोजित करण्यात आला. या उद्‌घाटन सोहळ्याचे उद्‌घाटक म्हणून दृगधामणा ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. मंगला रागीट उपस्थित होत्या. उद्‌घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. शिल्पा काळे (दृग्धधामणा ग्रामपंचायत सचिव) उपस्थित होत्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच श्री. शंकर गजभिये उपस्थित होते.

या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. सुरेखा शर्मा (शीलादेवी कॉलेज ऑफ एज्युकेशन, बोडी) तसेच प्राचार्य डॉ. लता खापरे (हिवरकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोडी) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व **NSS** स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात वंदेमातरम गीत आणि **NSS** गीताने औपचारीक प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर सरस्वती पुजन करण्यात आले. उपस्थित मान्यवर व  पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. **NSS** कार्यक्रम अधिकारी प्रा. राजेश्वरी सांगोळकर यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व सांगून स्वयंसेवकांनी राष्ट्रीय मूल्ये आत्मसात करून समाजसेवेसाठी सदैव तत्पर राहावे, असे मार्गदर्शन केले.

“गावगावची जागवू | श्रमदानाची सवय ||

उजळा समाजाची दिवा | तुकडोजी म्हणे ||”

या प्रेरणादायी उक्तीने कार्यक्रमास विशेष ऊर्जा मिळाली.यानंतर सांस्कृतिक सत्रात शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी समूहगीत, कविता व मनोगते सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांचे व ग्रामस्थांचे आभार मानण्यात आले.







**बुधवार १७डिसेंबर २०२५ :-**

१७/१२/२०२५ ला सकाळी ९.०० ते १२.३० शिबिराच्या दुसऱ्या दिवशी दृगधामणा गावात स्वच्छता अभियान श्रीमान शंकर गजभिये यांच्या निरीक्षणाखाली राबविण्यात आला. NSS स्वयंसेवकांनी गावातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे व परिसर स्वच्छ करून स्वच्छतेबाबत जनजागृती केली. स्वच्छतेचे महत्त्व सांगत नागरिकांना परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये स्वच्छता व आरोग्याबाबत सकारात्मक जाणीव निर्माण झाली.




## गुरुवार, १८ डिसेंबर २०२५ :

शिबिराच्या तिसऱ्या दिवशी दुपारी २.३० वाजता कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरस्वती पूजन व पाहुण्यांचे स्वागतवर्षांनी वृक्षांनी करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी NSS कार्यक्रम क्षेत्र समन्वयक श्री. नितीन कराळे यांनी मीडिया विषयावर सविस्तर व्याख्यान देत माध्यमांची समाजातील भूमिका, जबाबदारी व प्रभाव याबाबत मार्गदर्शन केले. शीलादेवी कॉलेज ऑफ एज्युकेशन येथील प्रा. डॉ. लीना तायवाडे मॅडम यांनी NSS चे महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच ग्रामपंचायतीच्या सचिव सौ. शिल्पा काळे यांनी करिअर विषयक माहिती दिली. कार्यक्रमास ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. मंगला रागीट यांचीही उपस्थिती होती.


GPS Map Camera
Google
Nagpur, Maharashtra, भारत
Drughdhamna 2, Nagpur, Maharashtra 440021, भारत
Lat 21.159811° Long 78.96132°
गुरुवार, 18/12/2025 03:22 PM GMT +05:30


हिवरकर आर्टस कॉमर्स अँड सायन्स कॉलेज
राष्ट्रीय सेवा योजना
विशेष हिवाळी शिबीर
GPS Map Camera
Google
दृग्धामना, महाराष्ट्र, भारत
5x66+2h8, दृग्धामना, महाराष्ट्र 440021, भारत
Lat 21.159808° Long 78.961384°
गुरुवार, 18/12/2025 03:40 PM GMT +05:30

## शुक्रवार १९ डिसेंबर २०२५

शिबिराच्या चौथ्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत NSS स्वयंसेवकांमार्फत **Parent Youth for Digital Literacy** व **Youth for Bharat** या उपक्रमांच्या अंतर्गत गावातील नागरिकांसाठी “मोबाईलचे फायदे व तोटे” या विषयावर जनजागृतीपर चर्चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश गावातील नागरिकांना डिजिटल साक्षर बनवणे, मोबाईलच्या योग्य वापराबाबत मार्गदर्शन करणे तसेच त्याच्या अति वापरामुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी जागरूकता निर्माण करणे हा होता.

चर्चा सत्रात गावकऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला व आपल्या समस्या व अनुभव मांडले. NSS स्वयंसेवकांनी प्रश्नोत्तर सत्राद्वारे उपस्थितांच्या शंका दूर केल्या आणि मोबाईलचा सुरक्षित, मर्यादित व जबाबदारीने वापर करण्याचा संदेश दिला. हा कार्यक्रम गावातील नागरिकांसाठी उपयुक्त ठरला असून डिजिटल साक्षरतेच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल ठरले.






## शनिवार २० डिसेंबर २०२५

शिबिराच्या पाचव्या दिवशी दुपारी १.०० ते ४.०० या वेळेत गावात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी शीलादेवी कॉलेज ऑफ एज्युकेशन येथील प्रा. डॉ. लिना तायवाडे मॅडम या विशेष प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच दिपक जेजानी हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. या कार्यक्रमास माजी विद्यार्थी म्हणून समृद्धी गणवीर, साक्षी रागीट, राणी चव्हाण, तनुक्षी खंडाते, ओमकारेश्वरी जाधव व पूजा ढबाले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. मंगला रागीट विराजमान होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व गणेश वंदना यांनी करण्यात आली. त्यानंतर **NSS** स्वयंसेवकांनी विविध सांस्कृतिक कला प्रकारांचे सादरीकरण केले. स्वयंसेवकांनी सादर केलेली लावणी, कोडी नृत्य, तांडव व गोंधळ या कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. याशिवाय जिल्हा परिषद शाळेतील मुला-मुलींनी सादर केलेल्या नृत्यप्रकारांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली. सर्व सादरीकरणे अतिशय उत्स्फूर्त व कौतुकास्पद होती. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन विद्यार्थीनी मुस्कान शेख हिने केले, तर आभार प्रदर्शन विद्यार्थीनी स्नेहल गोलाईत हिने केले.

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना संस्कृती जपण्याचे महत्त्व, शिक्षणाचे मूल्य व सामाजिक बांधिलकी याबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात सरपंच सौ. मंगला रागीट यांनी कार्यक्रमाचे कौतुक करून सर्व सहभागींचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन विद्यार्थीनी मुस्कान शेख हिने केले, तर आभार प्रदर्शन विद्यार्थीनी स्नेहल गोलाईत हिने केले.

या सांस्कृतिक कार्यक्रमास गावातील नागरिक, पालक, महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग कार्यक्रमाच्या यशात मोलाचा ठरला. उपस्थितांनी विविध सांस्कृतिक सादरीकरणांचा आनंद घेतला व कलाकारांना टाळ्यांच्या गजरात प्रोत्साहन दिले. त्यामुळे कार्यक्रम अधिक रंगतदार व उत्साही वातावरणात पार पडला.


शिला मल्टीपरपज सोसायटी
द्वारा संचालित
हिवरकर आर्टस कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज
वाडी, नागपूर.
AFFILIATED BY : RASHTRASANT TUKDOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY NAGPUR
NAAC ACCREDITED: B+ GRADE
राष्ट्रीय सेवा योजना
हिवरकर कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय
वाडी, नागपूर
राष्ट्रीय सेवा योजना (NSS)
स्वच्छता पंधवाडा


GPS Map Camera
Google
Drugdhamna, Maharashtra, India
5x56+qfg, Drugdhamna, Maharashtra 440021, India
Lat 21.159366° Long 78.96122°
Saturday, 20/12/2025 02:04 PM GMT +05:30




## रविवार, २१ डिसेंबर २०२५

सहाव्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० या वेळेत गावात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे आयोजन श्रीमान अनिल ढोणे यांच्या पुढाकाराने करण्यात आले असून साईनाथ ब्लड बँक, नागपूर यांचे सहकार्य लाभले. या रक्तदान शिबिराचा मुख्य उद्देश रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना मदत करणे तसेच समाजात रक्तदानाबाबत जनजागृती निर्माण करणे हा होता.

शिबिरामध्ये NSS स्वयंसेवकांनी व गावातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. अनेक स्वयंसेवक व गावकऱ्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. साईनाथ ब्लड बँकेच्या तज्ञ वैद्यकीय पथकाने रक्तदान प्रक्रिया सुरक्षितपणे पार पाडली व रक्तदात्यांची आवश्यक तपासणी करण्यात आली. रक्तदानाचे महत्त्व, त्याचे फायदे व गैरसमज दूर करण्याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. रक्तदात्यांना प्रमाणपत्रे व आवश्यक आरोग्यविषयक सूचना देण्यात आल्या. एकूणच हे रक्तदान शिबिर यशस्वी व प्रेरणादायी ठरले. या उपक्रमामुळे सामाजिक एकात्मता वाढली तसेच मानवतेची भावना अधिक दृढ झाली.


GPS Map Camera
Drugdhamna, Maharashtra, India
5x66+2h8, Drugdhamna, Maharashtra 440021, India
Lat 21.159948° Long 78.961412°
Sunday, 21/12/2025 11:30 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Drugdhamna, Maharashtra, India
5x66+2h8, Drugdhamna, Maharashtra 440021, India
Lat 21.1599° Long 78.961362°
Sunday, 21/12/2025 12:09 PM GMT +05:30
Google

## सोमवार, २२ डिसेंबर २०२५

शिबिराच्या सातव्या दिवशी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत गावात विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात ग्रामपंचायतीचे सरपंच व सचिव यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. त्यानंतर “विविधतेत एकता” या विषयावर विद्यार्थ्यांनी व NSS स्वयंसेवकांनी वेशभूषा सादरीकरण केले. या उपक्रमातून भारतातील सांस्कृतिक विविधता व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला.






दुसऱ्या सत्रात दुपारी १२.०० वाजता शालिनी दत्ता मेघे कॉलेज यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य तपासणी उपक्रमात **NSS** स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. या आरोग्य शिबिरामध्ये उपस्थित नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.






तिसऱ्या सत्रात दुपारी २.०० ते ४.०० या वेळेत शिबिराचा समारोप कार्यक्रम गावातील जेष्ठ लोकांच्या व सरपंच यांची उपस्थितीत पार पडला. पालकांनी या उपक्रमांचे कौतुक केले व विद्यार्थ्यांच्या सामाजिक सहभागाबद्दल समाधान व्यक्त केले. एकूणच हा दिवस पर्यावरण संरक्षण, राष्ट्रीय एकात्मता व आरोग्य जनजागृती यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला. **NSS** स्वयंसेवकांचा सक्रिय सहभाग व ग्रामस्थांचे सहकार्य यामुळे सर्व उपक्रम यशस्वीरीत्या पार पडले.




## शिबिरातील दिनचर्या

- सकाळी: - ६.०० ते ७.०० सकाळी उठणे, प्रातः विधी
- सकाळी: - ७.३० ते ८.३० प्रार्थना योगासने
- सकाळी ११.०० ते १.०० उद्‌बोधन कार्यक्रम
- दुपारी 1 ते 2 - भोजन अवकाश
- दुपारी 3 ते 4 विशेष मार्गदर्शन शिबीर
- दुपारी 4 ते 7 विविध खेळ, मनोरंजनात्मक, सांस्कृतिक कार्यक्रम